सकाळ

# अभियांत्रिकीच्या थेट द्वितीय वर्ष जागा घटल्याने कोंडी

## २० वरून १० टक्के जागा; ऐच्छिक महाविद्यालय निवडीच्या संधीला विद्यार्थी मुकणार

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १८ : दहावीनंतर पदविका शिक्षण घेत थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकीच्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. पदविकेच्या विद्यार्थ्यांसाठी द्वितीय वर्षातील जागा राखीव ठेवल्या जातात. या राखीव जागांचे प्रमाण २० वरून १० टक्क्यांवर आणल्याचा निर्णय पदविकेच्या विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना ऐच्छिक महाविद्यालयात प्रवेशापासून मुकावे लागेल, अशी भीती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे.



अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदे(एआयसीटीई)तर्फे जागा घटविण्याचा निर्णय घेतला असून, याविषयी नाराजी व्यक्त केली जात आहे. बारावीनंतर प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त राहत असल्याने त्यावर उपाय करण्याऐवजी थेट द्वितीय वर्ष प्रवेशात राखीव जागांचे प्रमाण करणे, हा पदविकेच्या विद्यार्थ्यांवर अन्याय असल्याची ओरड होत आहे. 'एआयसीटीई'च्या या निर्णयामुळे थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी स्पर्धा वाढेल. त्यामुळे महाविद्यालयाची निवड करण्याचा बहुतांश विद्यार्थ्यांचा हक्क हिरावला जाईल. मिळेल त्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागेल.

> 'एआयसीटीई'ने अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या महाविद्यालयात प्रवेश घेता येणार नसल्याने त्यांचे नुकसान होईल.
> – अशोक हुंडेकरी, पालक

### असा सुचविला पर्याय

जागांचे प्रमाण घटविल्याची माहिती मिळताच अशोक हुंडेकरी नामक पालकाकडून एआयसीटीई, महाराष्ट्र तंत्रशिक्षण संचालनालयासह अन्य विविध विभागांकडे पाठपुरावा केला जातो आहे. जागांचे प्रमाण २० वरून १० टक्क्यांवर आणण्याऐवजी प्रथम वर्षाची विद्यार्थी प्रवेशक्षमता काही प्रमाणात घटवत त्याआधारे पूर्वीप्रमाणे थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी २० टक्के जागा राखीव ठेवल्या, तरी उद्दिष्ट साध्य होणार असल्याचा दावा केला आहे. १० टक्क्यांचा नियम दोन-तीन शैक्षणिक वर्षे थांबून घेण्याचे जाहीर केल्यास विद्यार्थ्यांना स्पष्ट कल्पना येईल व त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, असा दावा केला आहे.

Nashik, Main
19/03/2019 Page No. 5